

# मेट्रो ३ च्या भुयारीकरणासाठी १७०० कर्मचारी करतात काम

## एकूण ५६ किमीच्या भुयारीकरणापैकी २८ किमीचे काम पूर्ण

**मुंबई (प्रतिनिधी) :**

मायानगरी मुंबईत मेट्रोचे जाळे वाढत चालले आहे. यातीलच मेट्रो-३ च्या भुयारीकरणाचे काम देखील वेगात सुरू असून या मागार्साठी एकुण ५६ किमीचे भुयारीकरण करण्यात येणार आहे, ज्यापैकी आत्तापर्यंत २८ किमी भुयारी मार्गिकेचे काम पूर्ण करण्यात आले आहे. मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशतर्फे सुरू असलेल्या या कामात सुमारे १७०० कर्मचारी आणी अधिकारी कार्यरत असून १७ टनेल बोरिंग मशीनचा वापर करण्यात येत आहे. तर प्रतिदिन सरासरी ४७.५ मीटरच्या भुयारीकरणाचे काम करण्यात येत असल्याचे एमएमआरसीतर्फे सांगण्यात आले आहे. मेट्रो-३ अंतर्गत कुलाबा-बांद्रा-सीप्झ हा परिसर येत असल्याने मुंबईतील जुन्या इमारती, मिठी नदी आणि उन्नत मुंबई मेट्रो-१ या खालून भुयारीकरण करणे आव्हानात्मक आहे. यासाठीच सुमारे १७०० कर्मचारी आणि अधिकारी यांची नेमणूक करण्यात आली आहे.